॥ भावनांचा तू भुकेला रे मुरारी ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः मंगेश पाडगांवकर
संगीतः श्रीनिवास खळे

भावभोळ्या भक्तिची ही एकतारी
भावनांचा तू भुकेला रे मुरारी ॥ धृ. ॥

काजळी रात्रीत होशी तूच तारा
वादळी नौकेस होशी तू किनारा
मी तशी आले तुझ्याही आज दारी ॥ १ ॥

भाबडी दासी जनी गाताच गाणी
दाटुनी आले तुझ्या डोळ्यात पाणी
भक्तिचा वेडा असा तू चक्रधारी ॥ २ ॥

शापिलेली ती अहिल्या मुक्त केली
आणि कुब्जा स्पर्श होता दिव्य झाली
वैभवाचा साज नाही मी भिकारी ॥ ३ ॥

अंतरीची हाक वेडी घालते रे
वाट काट्यांची अशी मी चालते रे
जाणिशी तु माझी व्यथा ही, तूच तारी ॥ ४ ॥